॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572**

**Phone: (02462) 215325**

**website: srtmun.ac.in**

**E-mail: pro@srtmun.ac.in**

## Public Relations Office (PRO)

**जनसंपर्क कार्यालय**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/२५९ दि.२५/१२/२०२४

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये राष्ट्रीय गणित दिवसाच्या निमित्ताने विविध स्पर्धेचे आयोजन

राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, नवी दिल्ली तसेच राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई महाराष्ट्र यांच्या सहकार्याने राष्ट्रीय गणित दिवसाचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील गणितीयशास्त्र संकुलातर्फे दि. २८ ते ३१ डिसेंबर दरम्यान गणिताचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करणारे व जनजागृतीपर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते होणार आहे.

दि. २८ डिसेंबर रोजी पेनिशिया इंटरनॅशनल स्कूल नांदेड येथील ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थी व पालकांमध्ये गणिताचे महत्त्व निर्माण करण्यासाठी दोन विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी पुणे विद्यापीठातील नामवंत प्राध्यापक डॉ. विनायक जोशी व डॉ. यशवंत बोरसे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

दि. ३० डिसेंबर रोजी गणिताच्या शालेय शिक्षकांना फॅकल्टी ट्रेनिंग प्रोग्राम अंतर्गत मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील प्रा. डॉ. गणेश केदार व मौलाना आझाद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सादिक शेख यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या सुवर्ण संधीच्या जास्तीत जास्त शालेय विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पेनिसिया इंटरनॅशनल स्कूलचे प्रिन्सिपल व कार्यक्रम समन्वयक रीना नायर यांनी केले आहे.

विद्यापीठांतर्गत येणाऱ्या चार जिल्ह्यातील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली येथे जिल्हास्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी मॅथ क्युझ कॉम्पिटिशन व मॅथ मॉडेल मेकिंग या स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले आहे. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी मॅथेमॅटिक्स फोर बेटर वर्ल्ड' या थीमवर भितीपत्रके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय पातळीवर जे विद्यार्थी विजेते होतील त्यांच्यासाठी अंतिम स्पर्धा विद्यापीठ परिसरामध्ये दि. ३१ डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहेत.

तरी या संधीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव तथा गणितीयशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. डी. डी. पवार यांनी केले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी (९०९६०७७७८९) व आयोजन सचिव डॉ. रूपाली जैन (९७६६६१६५४४) यांच्याशी संपर्क साधावा.

---